जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १८७ | मंगळवार, २७ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

# लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात राजकीय युद्ध

## तिसरी आघाडी ठरणार किंगमेकर, माघारीनंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार?

**लोणी काळभोर, ता. २६ :** लोणी काळभोर जिल्हा परिषद गट, कदमवाकवस्ती व लोणी काळभोर-वडकी पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारी अर्ज माघारीची अंतिम मुदत मंगळवारी (ता. २७) संपत असून, त्यानंतरच या निवडणुकीचे खरे आणि निर्णायक चित्र स्पष्ट होणार आहे. सध्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात सरळ लढतीचे संकेत असले तरी, पडद्यामागे घडणाऱ्या घडामोडींमुळे तिसऱ्या आघाडीची शक्यता अधिकच बळावली आहे. ही आघाडी प्रत्यक्षात उतरली, तर दोन्ही प्रमुख पक्षांचे राजकीय गणित कोलमडण्याची दाट शक्यता आहे.



लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात भाजपकडून पूनम बाबुराव गायकवाड तर राष्ट्रवादीकडून शीतल कांबळे यांच्यात थेट आणि टोकाची लढत पाहायला मिळणार आहे. लोणी काळभोर-वडकी पंचायत समिती गणात भाजपच्या श्वेता काळभोर आणि राष्ट्रवादीच्या रेश्मा काळभोर यांच्यात प्रतिष्ठेची लढाई रंगली आहे. तर कदमवाकवस्ती गणात भाजपचे ज्ञानेश्वर नामुगडे आणि राष्ट्रवादीचे अमोल टेकाळे यांच्यात जोरदार टक्कर होत आहे. तिन्ही ठिकाणी भाजप विरुद्ध राष्ट्रवादी असा थेट सामना असला तरी, निकाल इतका सोपा राहणार नाही, हे स्पष्ट होत आहे.

दरम्यान, स्थानिक पातळीवर नाराज नेते, पक्षांतर्गत गटबाजीला वैतागलेले कार्यकर्ते आणि स्वतंत्र राजकीय समीकरणे जुळवणारे प्रभावी चेहरे एकत्र येऊन तिसरी आघाडी उभारण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादीने तिकीट कापल्याने नाराज झालेल्या अनिता गवळी आणि लोणी काळभोर-वडकी गणात भाजपने तिकीट नाकारलेल्या विद्या गायकवाड या एकत्र येऊन निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ही आघाडी अधिकृतपणे जाहीर झाली, तर राष्ट्रवादी आणि भाजप या दोन्ही पक्षांची मते विभागली जाणे अटळ मानले जात आहे.

राष्ट्रवादी व भाजप या दोन्ही प्रमुख पक्षांनी प्रचारात पूर्ण ताकद झोकून दिली असून गावोगावी बैठका, घराघरांत संपर्क दौरे आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या आहेत. विकासकामांचे श्रेय, मागील कार्यकाळातील अपयश, पाणी, रस्ते, आरोग्य, वीज यांसारख्या स्थानिक प्रश्नांवरून एकमेकांवर सडकून टीका केली जात आहे. मात्र, या गदारोळात तिसरी आघाडी आणि अपक्ष उमेदवारांची हालचालच खरी निर्णायक ठरणार आहे. असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

दरम्यान, अपक्ष उमेदवारांनीही निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतल्याने लढत अधिकच बहुरंगी झाली आहे. काही अपक्ष उमेदवार हे स्थानिक पातळीवर मजबूत पकड असलेले असून ते मोठ्या पक्षांसाठी डोकेदुखी ठरू शकतात. मतांचे विभाजन नेमके कोणाच्या फायद्यात जाणार, याबाबत सध्या तरी कुणीही ठाम दावा करू शकत नाही.

एकूणच, राष्ट्रवादी व भाजपमध्ये थेट लढत दिसत असली तरी तिसरी आघाडी आणि अपक्षांची ताकद पाहता कोणाचे पारडे जड आहे, हे सध्या तरी गुलदस्त्यात आहे. उद्या अर्ज माघारीनंतर अंतिम चित्र स्पष्ट होणार असून, त्यानंतरच लोणी काळभोर जिल्हा परिषद गटात सत्ता कुणाच्या हाती जाणार, याचा अंदाज बांधता येणार आहे. तोपर्यंत मात्र या भागातील राजकीय तापमान आणखी चढत जाणार, हे मात्र नक्की आहे.

### पडद्यामागील हालचालींना वेग

राष्ट्रवादी व भाजपने तिकीट कापल्याने नाराज गट शांत बसलेला नसून, पडद्यामागे तिसऱ्या आघाडीला अप्रत्यक्ष पाठिंबा देण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मागील दोन दिवसांत लोणी काळभोर, कदमवाकवस्ती आणि वडकी परिसरात गुप्त बैठका, रात्री उशिरापर्यंत चाललेल्या चर्चा आणि अचानक वाढलेले संपर्क दौरे यामुळे राजकीय वातावरण अधिकच संशयास्पद बनले आहे. काही ठिकाणी कोण कुणासाठी काम करतोय? हा प्रश्न कार्यकर्त्यांनाच पडल्याचे चित्र आहे. त्यामुळे अधिकृत प्रचारापेक्षा आतील फुटीचा फटका कोणाला बसणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त

### बजेटमध्ये टॅक्स, कस्टम ड्युटीत बदलांची शक्यता

**नवी दिल्ली, ता. २६ :** येत्या १ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण सलग नववे बजेट सादर करणार असून, या अर्थसंकल्पाकडून सर्वसामान्यांसह उद्योजकांना मोठ्या अपेक्षा आहेत. यावेळच्या बजेट मध्ये सीमा शुल्क अर्थात कस्टम ड्युटीच्या संरचनेत जीएसटीच्या धर्तीवर मोठे बदल होण्याची शक्यता असून, यामुळे आयात-निर्यात प्रक्रिया अधिक सुलभ होऊ शकते. वैयक्तिक करदात्यांसाठी स्टँडर्ड डिडक्शनमध्ये वाढ करून सरकार मोठा दिलासा देण्याची चिन्हे आहेत. तसेच १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तिकर कायदा २०२५ बाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर होऊ शकतात. टीडीएसचे नियम सोपे करण्यासोबतच जुन्या कर प्रणालीऐवजी नवीन कर प्रणालीकडे नागरिकांना आकर्षित करण्यासाठी विशेष सवलती दिल्या जाऊ शकतात. संरक्षण क्षेत्रातील वाढता तणाव पाहता या क्षेत्रासाठी भरीव तरतूद अपेक्षित आहे. याशिवाय, ८ व्या वेतन आयोगाबाबत महत्वाची घोषणा होण्याची शक्यता असल्याने सरकारी कर्मचाऱ्यांचे लक्ष या बजेटकडे लागलेय. ग्रामीण विकास आणि रोजगारासाठी नवीन योजनांची घोषणाही होऊ शकते.

### पुणे-सातारा प्रवास बोगद्यामुळे अवघ्या ७ मिनिटांत होणार

**पुणे, ता. २५ :** पुणे-सातारा महामार्गावर प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. प्रवाशांचा कस पाहणारा आणि अनेकदा अपघातांना निमंत्रण देणारा 'खंबाटकी घाट' आता इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहे. खंबाटकी बोगदा प्रकल्पाचे काम आता शेवटच्या टप्प्यात आले असून, जून २०२६ पासून हा सहा पदरी मार्ग वाहतुकीसाठी पूर्णपणे सज्ज होणार आहे.

या प्रकल्पामुळे घाटातील ४५ मिनिटांचा त्रासदायक प्रवास आता अवघ्या ७ मिनिटांवर येणार आहे. पुणे आणि सातारा या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारा खंबाटकी घाट हा 'ब्लॅक स्पॉट' म्हणून ओळखला जायचा. घाटातील तीव्र वळणे आणि चढणीमुळे येथे अवजड वाहने अडकून पडायची, परिणामी तासनतास वाहतूक कोंडी व्हायची. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यावर कायमस्वरूपी तोडगा म्हणून बोगदे आणि १ किलोमीटर लांबीचा भव्य दरीपूल बांधण्यात आला आहे.

सध्या साताऱ्याकडून पुण्याकडे येणाऱ्या वाहनांसाठी एक बोगदा प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहे. दरम्यान, संपूर्ण काम वेगाने सुरू असून, पावसाळ्यापूर्वी म्हणजेच जून २०२६ पर्यंत काम पूर्ण होईल.

# भारतीय संविधानामुळेच देशाची लोकशाही अधिक बळकट : उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे, ता. २६ :** भारतीय संविधानाच्या बळावरच विविध भाषा, धर्म, जाती व संस्कृती असलेला भारत देश जगातील सर्वात मोठे व यशस्वी लोकशाही राष्ट्र म्हणून उभा आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही व्यवस्था टिकवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.



७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा आज पोलीस संचलन मैदानावर ध्वजारोहण व संचलनासह मुख्य शासकीय समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा पोलीस अधिक्षक संदीपसिंह गिल उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे कुटुंबीय, सैन्यदल, निमलष्करी व पोलीस दलांचे अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

स्वातंत्र्यलढ्यात देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करत श्री.पवार यांनी त्यांना भावपूर्ण वंदन केले. गोवा मुक्ती संग्राम, हैदराबाद-मराठवाडा मुक्ती संग्राम तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी हौतात्म्य पत्करलेल्या वीरांचेही त्यांनी अभिवादन केले. देशाची एकता, अखंडता व सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

विजेत्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केंद्र सरकारच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या शौर्य व सेवा पदक तसेच पद्म पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील मान्यवरांचा समावेश हा राज्यासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे अजित पवार यांनी नमूद केले. पोलीस, अग्निशमन, होमगार्ड व सुधारात्मक सेवांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह कला, उद्योग, समाजसेवा, क्रीडा, वैद्यकीय व कृषी क्षेत्रातील पद्म पुरस्कार विजेत्यांनी महाराष्ट्राची मान देशपातळीवर उंचावली असल्याचे त्यांनी सांगितले. स्वातंत्र्यलढा व सामाजिक सुधारणांच्या चळवळीत पुण्याची भूमिका ऐतिहासिक व निर्णायक राहिल्याचेही त्यांनी सांगितले.

# भगत सिंह कोश्यारी यांना पद्मभूषण पुरस्कार मिळाल्यामुळे वाद

## मला कोणत्याही विवादात पडायचं नाही - देवेंद्र फडणवीस

**नवी दिल्ली, ता. २६ :** प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्राचे राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला. महाराष्ट्राचे राज्यपाल असताना भगत सिंह कोश्यारी यांनी अनेक वादग्रस्त वक्तव्य केल्याचा दावा करत अनेक विरोधकांनी यावर नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्यांचा भाजपा सन्मान करते, असं म्हणत संजय राऊतांनी टीका केली होती. आता यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, काही छोट्या मनाचे लोक एकप्रकारे विवाद निर्माण करत आहेत. मला कोणत्याही विवादात पडायचं नाही. पण काही लोकांच्या काळात काय काय घडलंय, कोणाला पद्मश्री मिळालाय हे सांगितलं तर ते आजच्या दिवसाचं औचित्य राहणार नाही. म्हणून मी त्याबद्दल काही बोलत नाही.

माझी कोणी प्रशंसा करावी किंवा निंदा करावी म्हणून मी काम करत नाही. मी संघाचा स्वयंसेवक आहे. भारतमाता माझ्यासाठी सर्वकाही आहे. त्यासाठी मी काम करत असतो आणि काम करत राहणार. हे काम करत असताना कोणाला वाईट वाटत असेल तर त्याला मी काय करणार? असं भगतसिंह कोश्यारी म्हणाले.

संजयराऊतांनीकायटीकाकेली? महाराष्ट्रात लोकशाही आणि भारतीय संविधानाची हत्या करून शिंदे-भाजपाचे सरकार बसवल्याबद्दल या महाशयांना मोदी सरकारने पद्म भूषण किताबाने सन्मानित केले.

याच महाशयांनी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले दाम्पत्याचा अपमान केला होता! महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्यांचा भाजपा सन्मान करते! छान, असं म्हणत संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर टीका केली.

# पुणे जिल्ह्यातील ६८ हजार रेशनकार्ड धारकांवर संक्रांत

**पुणे, ता. २६ :** पुणे जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक अत्यंत मोठी अन् महत्त्वाची बातमी समोर आली आहे. पुणे जिल्ह्यातील ६८ हजार संशयास्पद रेशनकार्ड धारकांवर संक्रांत येणार आहे. गैरप्रकार टाळण्यासाठी अशी रेशनिंग कार्ड बंद होणार असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत तहसीलदारांकडून अंतिम कारवाई करण्यात येणार आहे. महत्त्वाचं म्हणजे यामध्ये पिंपरी चिंचवडमधील शिधा पत्रिका धारकांचाही समावेश आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने शिधापत्रिकांच्या शुद्धीकरणाची मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेतंर्गत पुणे जिल्ह्यातील पुणे पिंपरी चिंचवड आणि पुणे ग्रामीण मधील तब्बल ६८ हजार संशयास्पद शिधापत्रिका प्रशासनाच्या रडारवर आल्या असून, त्यांच्यावर लवकरच अपात्रतेची कारवाई केली जाणार आहे. प्रशासनाने आधार कार्ड क्रमांक आणि संगणकीय प्रणालीमधील माहितीच्या आधारे जिल्ह्यानुसार संशयास्पद लाभार्थ्यांच्या याद्या तयार केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींची तपासणी केली जात आहे, यात मृत व्यक्तींची नावे अद्यापही कार्डावर असणे, एकाच व्यक्तीचे नाव दोन ठिकाणी (दुबार) असणे. माहितीमध्ये तफावत असलेले संशयास्पद लाभार्थी याचा तपास केला जात आहे. तहसीलदार घेणार अंतिम निर्णय या मोहिमेचे गांभीर्य लक्षात घेता, पुरवठा निरीक्षक सध्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पडताळणी करत आहेत. या तपासणीनंतर सादर होणाऱ्या अहवालाच्या आधारे संबंधित नावे वगळण्याचे अंतिम अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे पुणे जिल्ह्यातील रेशनिंग व्यवस्थेतील गैरप्रकारांना चाप बसणार असून, खऱ्या लाभार्थ्यांसाठी धान्याचा साठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.



# इंदापूर तालुक्यातून पती-पत्नी आठ दिवसांनंतरही बेपत्ता

## देवदर्शनाचा बहाणा की काही वेगळेच? पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान

**इंदापूर, ता. २५ :** बाभुळगाव (ता. इंदापूर) येथून आदमापूर येथे बाळुमामाचे दर्शन घेण्यासाठी निघालेले तरुण पती-पत्नी तब्बल आठ दिवस उलटूनही अद्याप बेपत्ता असल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

आकाश तुकाराम वाईकर (वय २८) व त्याची पत्नी निकीता आकाश वाईकर (वय २०) यांचा कोणताही ठावठिकाणा न लागल्याने पोलिसांसमोर शोधाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या प्रकरणी आकाशची आई संगिता तुकाराम वाईकर (वय ४५, व्यवसाय-मजुरी, रा. बाभुळगाव) यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आकाश हा अकलुज येथील आर.बी.एल. प्रा. लि. फायनान्स कँपनीत कार्यरत आहे. ता.१८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास संगिता वाईकर व त्यांचे पती मजुरीच्या कामासाठी घराबाहेर पडले होते. त्यावेळी घरात आकाश व निकीता हे दोघेच उपस्थित होते. दुपारी साडेतीनच्या सुमारास आकाश याने आईला फोन करून आम्ही दोघे आदमापूर येथे बाळुमामाचे दर्शन घेण्यासाठी जात आहोत, असे सांगितले.

त्याच दिवशी सायंकाळी सातच्या सुमारास आकाश याचा पुन्हा फोन आला. आम्ही देवदर्शनासाठी निघालो आहोत, तुम्ही जेवण करून घ्या, असे सांगून त्याने फोन बंद केला. मात्र, दुसऱ्या दिवशी १९ जानेवारीपासून आकाशचा मोबाईल क्रमांक सतत बंद लागत असल्याने कुटुंबीयांची चिंता अधिकच वाढली. दिवसभर प्रयत्न करूनही संपर्क न झाल्याने आकाश व निकीता हे दोघे आदमापूर येथे न जाता कुठेतरी अज्ञात ठिकाणी निघून गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. आठ दिवस उलटूनही कोणताही मागमूस न लागल्याने या प्रकरणाला संशयाचे गडद सावट आले आहे.

दरम्यान, अखेर इंदापूर पोलीस ठाण्यात खबरी जबाब दाखल करण्यात आला असून पोलीस विविध दिशांनी तपास करत आहेत. नागरिकांनी या दाम्पत्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास त्वरित इंदापूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



पुणे प्राइम न्यूज

http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### राजधानीत गणपती बाप्पा मोरयाचा गजर; कर्तव्य पथावर अवतरला गणेशोत्सव

**नवी दिल्ली, ता. २६ :** भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त राजधानीतील कर्तव्य पथावर मोठ्या उत्साहात साजरा झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ध्वजारोहण केल्यानंतर झालेल्या दिमाखदार संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गणेशोत्सव या संकल्पनेवर आधारित असलेल्या या चित्ररथात राज्यातील सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवण्यात आले. चित्ररथावर अष्टविनायक प्रतिकृती, मूर्ती साकारणारा कलाकार आणि ढोल पथकातील महिला वादकांचा जिवंत देखावा सादर करण्यात आला होता. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयेन या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. एकूण ३० चित्ररथांच्या सहभागात महाराष्ट्राच्या कलाकारांनी सादर केलेला नृत्याविष्कार प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र ठरला.



### भारतीय लष्कराची स्मार्ट ताकद; परेडमध्ये आधुनिक शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन

**नवी दिल्ली, ता. २६ :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी कर्तव्य पथावर भारतीय लष्कराने आपल्या आधुनिक युद्धक्षमतेचे चित्तवेधक प्रदर्शन केले. ऑपरेशन सिंदूरमधील यशानंतर प्रथमच लष्कराने स्वदेशी ड्रोन, रोबोटिक सिस्टीम आणि हायपरसोनिक क्षेपणास्त्रांच्या जोरावर आपली वाढलेली ताकद जगाला दाखवून दिली. युक्रेन युद्धातील अनुभवातून शिकत लष्कराने रणगाड्यांवर अँटी-ड्रोन सुरक्षा कवच तैनात केले असून, ड्रोनच्या वापरामुळे शत्रूवर हल्ला करण्याचा वेळ ३० मिनिटांवरून केवळ ३ मिनिटांवर आलाय. यावेळी १५०० किमी पल्ला गाठणारे हायपरसोनिक क्षेपणास्त्र आणि सूर्यास्त्र रॉकेट लॉन्चर ही परेडची प्रमुख आकर्षणे ठरली. आता आपले सैन्य केवळ पारंपरिक पद्धतीने नाही, तर हायटेक तंत्रज्ञानाने युद्ध लढण्यासाठी सज्ज झालेय.

### सीएनजी कार विक्रीत मारुति अर्टिगाचा बोलबाला


**नवी दिल्ली, ता. २६ :** डिझेल इंजिनच्या वाढत्या किमती आणि इंधनाचे दर गगनाला भिडल्याने भारतीय ग्राहकांचा ओढा आता सीएनजी कारकडे वाढलाय. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये देशात सीएनजी गाड्यांच्या विक्रीचा नवा विक्रम प्रस्थापित झाला असून, मारुति सुझुकी अर्टिगा १,२९,९२० युनिट्ससह अव्वल स्थानी राहिलीय. कमी खर्च आणि उत्तम मायलेजमुळे मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सीएनजी आता पहिला पर्याय ठरतेय. मारुतीच्या वॅगनआर आणि डिझायरने अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावत आपला दबदबा कायम राखलाय. दुसरीकडे टाटा पंच आणि मारुति ब्रेझानेही विक्रीत मोठी मजल मारली असून टाटा नेक्सॉन व ह्युंदाई ऑरा सारख्या मॉडल्सनी ग्राहकांना आकर्षित केलेय.

# राज्यात विजेचे दर वाढणार?; महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून पुन्हा सुनावणी

## ग्राहक संघटनेचा आक्षेप

**मुंबई, ता. २६ :** महावितरणने दाखल केलेल्या पुनर्विलोकन याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने संपूर्ण प्रक्रिया पुन्हा नव्याने राबवण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाच्या रचनेत झालेल्या बदलामुळे यापूर्वी घेण्यात आलेल्या जनसुनावण्या अमान्य ठरवत, आता फेब्रुवारी महिन्यात राज्यभर पुन्हा जनसुनावण्या घेण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे आधीच आपली बाजू मांडलेल्या वीजग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. वीज दार वाढवण्यासाठी हा घाट रचल्याचा आरोप होत आहे.

सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ मध्ये दिलेल्या आदेशानंतर महावितरणने



५ डिसेंबर २०२५ रोजी या प्रकरणावर हरकती मागविल्या होत्या. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये राज्यातील विविध सहा ठिकाणी जनसुनावण्या घेण्यात आल्या. मात्र, आयोगाच्या सदस्यांमध्ये बदल झाल्याने ही संपूर्ण प्रक्रिया पुन्हा नव्याने राबवली जात असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षांनी राजीनामा दिल्यावर नवीन अध्यक्षांच्या नियुक्तीमुळे ही सुनावणी पुन्हा घेतली जात आहे.

ज्या वीजग्राहकांनी, संघटनांनी व भागधारकांनी यापूर्वी हरकती व सूचना नोंदविल्या होत्या, त्यांनाच आता पुन्हा आपले म्हणणे मांडावे लागणार आहे. आयोगाने हा निर्णय नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वावर आधारित असल्याचे सांगितले असले, तरी वारंवार सुनावण्या घेणे म्हणजे निर्णय लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप ग्राहक संघटनांकडून केला जात आहे.

राज्यभर जनसुनावण्यांचे आयोजनतांत्रिक अडचणींमुळे ऑनलाइन पद्धतीने सहभागी होता येऊ न शकणाऱ्या नागरिकांसाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये सुविधा केंद्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्व जनसुनावण्या सकाळी दहा वाजता तीस मिनिटांनी सुरू होणार आहेत. जनसुनावणीत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व नागरिकांनी आयोगाने १४ नोव्हेंबर २०२२ रोजी जाहीर केलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### ग्राहक संघटनांचा आक्षेप

महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेचे सचिव जाविद मोमिन यांनी या निर्णयावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. आयोगातील अंतर्गत बदलांचा फटका वीजग्राहकांना बसू नये. वारंवार नव्याने सुनावणी घेणे म्हणजे वेळकाढूपणा असून, वीजदरांबाबतचे निर्णय पुढे ढकलण्याचा हा प्रकार थांबवावा, अशी मागणी त्यांनी केली. महावितरणच्या या याचिकेवर होणाऱ्या नव्या जनसुनावणीकडे राज्यातील सर्व वीजग्राहकांचे लक्ष लागले असून, या प्रक्रियेतून वीजदरांबाबत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

# नागपूर–गोवा शक्तिपीठ महामार्गाचे अंतिम संरेखन मंजुरीसाठी सादर

## १३ जिल्ह्यांतून जाणारा ८५६ किमी लांबीचा महामार्ग

**मुंबई, ता. २६ :** नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग हा राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात असला, तरी विविध जिल्ह्यांतील विरोधामुळे प्रकल्पा समोर मोठे आव्हान उभे आहे. कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्गसह अनेक भागांत शेतकरी व जमीनधारकांनी आंदोलन छेडले असतानाही सरकार प्रकल्प राबवण्यावर ठाम आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) महामार्गाचे सुधारित आणि अंतिम संरेखन निश्चित करून ते राज्य सरकारकडे मंजुरीसाठी सादर केले आहे.

एमएसआरडीसीने दिलेल्या माहितीनुसार, अंतिम संरेखनानुसार नागपूरगोवा शक्तिपीठ महामार्गाची




लांबी आता ८५६ किलोमीटर झाली आहे, जे आधी प्रस्तावित ८४० किमीपेक्षा जास्त आहे. हा महामार्ग राज्यातील १३ जिल्ह्यांतून जाणार असून सुमारे ३९५ गावांवर थेट परिणाम होणार आहे.

नागपूरगोवा महामार्ग हा नागपूरमुंबई समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर विकसित करण्याचा निर्णय घेतला गेला आहे. सुरुवातीला जिल्ह्यांना जोडणाऱ्या सुमारे ८०३ किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे संरेखन तयार करून सरकारकडे सादर केले गेले होते, परंतु कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग इत्यादी भागांत शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधामुळे सुधारणा करावी लागली.


शेतकरी व स्थानिक नागरिकांच्या मुख्य तक्रारींमध्ये सुपीक शेतीवर होणारा परिणाम, धार्मिक स्थळांची सुरक्षितता, पर्यावरणीय धोके आणि योग्य मोबदल्याची अनिश्चितता यांचा समावेश आहे. काही भागांत प्रकल्प रद्द करण्याची, तर काही ठिकाणी संरेखन बदलण्याची मागणी करण्यात आली होती. एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी सांगितले की, नव्याने निश्चित केलेला अंतिम संरेखन प्रस्ताव नुकताच राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे. या प्रस्तावानुसार महामार्गाची लांबी ८४० किमीवरून वाढून ८५६ किमी झाली असून, सरकारच्या निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पिंपरी–चिंचवडच्या कानाकोपऱ्यात एआयचा पहारा

## सरकारचा मोठा 'हाय-टेक' निर्णय

**पिंपरी-चिंचवड, ता. २६ :** आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहराच्या सुरक्षेचा चेहरामोहरा आता बदलणार आहे. वाढती गुन्हेगारी आणि वाहतुकीचा ताण लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाच्या उच्चस्तरीय समितीने शहरासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा 'एकात्मिक सीसीटीव्ही निगराणी प्रकल्पा'ला हिरवा कंदील दाखवला आहे. हे कॅमेरे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे.

पिंपरी-चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क आणि चाकण-तळेगाव हा औद्योगिक पट्टा वेगाने विस्तारत आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर होणारी आर्थिक उलाढाल आणि वाढती लोकसंख्या यामुळे पोलिसांवर सुरक्षेचा मोठा ताण आहे. पारंपारिक यंत्रणेला मर्यादा येत असल्याने, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा



वापर करून गुन्हेगारांवर वचक बसवण्यासाठी हा प्रकल्प आखला गेला आहे. या प्रकल्पात स्मार्ट सिटी आणि महापालिकेचे जुने कॅमेरे नवीन यंत्रणेशी जोडले जातीलच, शिवाय संवेदनशील भागात नवे हाय-टेक कॅमेरेही बसवले जाणार आहेत. दरम्यान, औद्योगिक क्षेत्रातील कामगार आणि आयटी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी हिंजवडी, भोसरी एमआयडीसी आणि चाकण परिसरावर या यंत्रणेची विशेष नजर असेल. यामुळे महिलांची सुरक्षितता आणि रस्ते अपघातांच्या वेळी तातडीने मदत मिळणे शक्य होणार आहे.

# हिंजवडीतील अपघातात जखमी १४ वर्षीय मुलाला आयटी कर्मचाऱ्यांची मदत

**पुणे, ता. २६ :** पुण्यात मानवी संवेदना आणि सामाजिक जबाबदारीचे उदाहरण पाहायला मिळाले आहे. हिंजवडी आयटी पार्क परिसरात झालेल्या एका रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या १४ वर्षीय मुलाला वेळेवर मदत मिळावी यासाठी फोरम ऑफ आयटी एम्प्लॉईजच्या सदस्यांनी पुढाकार घेतला. रविवारी सकाळी राजीव गांधी आयटी पार्क परिसरात ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे १० वाजता अवजड वाहनांना बंदी असलेल्या वेळेत एका ट्रकने रस्त्यावर फुगे विकणाऱ्या मुलाला धडक दिली. या अपघातात मुलगा गंभीर जखमी झाला असून त्याच्या पायाला मोठी इजा झाली. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण होते.




घटनेची माहिती मिळताच फोरम ऑफ आयटी एम्प्लॉईजचे अध्यक्ष पवनजीत माने, सदस्य आशुतोष पांडे, प्रशांत पंडित आणि इतर सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी मुलाला तातडीने उपचार मिळावेत यासाठी प्रयत्न सुरू केले. सुरुवातीला मुलाला पिरंगुट येथील आस्था रुग्णालयात नेण्यात आले, मात्र तेथे दाखल करून घेण्यात आले नाही. त्यानंतर दुपारी सुमारे १२ वाजता सुस येथील सिम्बायोसिस रुग्णालयात नेण्यात आले. मात्र आयसीयू बेड आणि तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने पुढील रुग्णालयात हलवण्याचा सल्ला देण्यात आला.

अखेर दुपारी सुमारे १:३० वाजता मुलाला संचेती रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरुवातीला उपचार सुरू होण्यास विलंब झाला, मात्र फोरमच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती बदलली. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी रुग्णालय प्रशासनाशी संपर्क साधून उपचार तत्काळ सुरू करण्यास मदत केली. निधीअभावी उपचार थांबणार नाहीत, याचीही खात्री करण्यात आली.

दरम्यान, अपघातास कारणीभूत ठरलेल्या ट्रक चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे अपघातग्रस्तांना तातडीचे उपचार मिळण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्म विभूषण जाहीर

## चित्रपटसृष्टीतील योगदानाची सर्वोच्च दखल

**मुंबई, ता. २६ :** हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना त्यांच्या दीर्घकालीन आणि बहुआयामी योगदानाबद्दल पद्म विभूषण हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा नागरी सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार त्यांना मरणोत्तर स्वरूपात देण्यात येणार आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या पद्म पुरस्कार यादीत धर्मेंद्र यांच्यासह झारखंडचे ज्येष्ठ नेते शिबू सोरेन यांनाही राजकीय क्षेत्रातील योगदानासाठी मरणोत्तर पद्म विभूषण जाहीर करण्यात आला आहे. तर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना पद्म भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जाहिरात क्षेत्रातील दिग्गज पियुष पांडे यांनाही



मरणोत्तर पद्म भूषण जाहीर झाला आहे.

१९६० च्या दशकात चित्रपटसृष्टीत पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी रोमँटिक हिरो, ॲक्शन स्टार, गंभीर अभिनेता आणि विनोदी भूमिकांपर्यंत प्रत्येक छटा समर्थपणे साकारली. दिल भी तेरा हम भी तेरे, अनपढ, बंदिनी, फुल और पत्थर, आयी मिलन की बेला, देवर, अनुपमा, आये दिन बहार के यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी अभिनयाची छाप उमटवली. यादों की बारातमधील शंकर, सीता और गीता, ड्रीम गर्ल आणि विशेषतः ऋषिकेश मुखर्जी दिग्दर्शित चुपके चुपकेमधील प्यारे मोहन ही भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे.

गंभीर अभिनयाइतकाच विनोदातही ते तितकेच सहज होते, हे त्यांनी ठसवून दाखवलं. दीर्घ आणि यशस्वी कारकिर्द असूनही धर्मेंद्र यांना वैयक्तिक अभिनय पुरस्कार तुलनेने कमी मिळाले. १९९७ मध्ये त्यांना लाईफटाईम अचिव्हमेंट पुरस्कार प्रदान करण्यात आला, तर २०१२ मध्ये भारत सरकारने त्यांच्या सिनेसृष्टीतील योगदानाची दखल घेत पद्म भूषण देऊन गौरव केला होता.

### रीलस्टार प्रथमेश कदमचं निधन



**मुंबई, ता. २६ :** संपूर्ण देश प्रजासत्ताक दिनाचा जल्लोष साजरा करत असतानाच, आपल्या जबरदस्त डान्स आणि हटकेव्हिडिओने लाखो लोकांच्या मनावर राज्य करणारा मराठमोळा रीलस्टार प्रथमेश कदम याचे दुःखद निधन झाले आहे. त्याचा जवळचा मित्र तन्मय पाटेकर याने सोशल मीडियाद्वारे ही माहिती देताच चाहत्यांवर शोककळा पसरली आहे. मुंबईचा रहिवासी असलेल्या प्रथमेशचे इन्स्टाग्रामवर १ लाख ८६ हजारांहून अधिक फॉलोअर्स होते. त्याच्या यशात त्याची आई प्रज्ञा कदम यांचा मोठा वाटा होता. आई-लेकाची डान्स केमिस्ट्री आणि त्यांचे विनोदी व्हिडिओ नेटकऱ्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय होते. प्रज्ञा कदम यांचेही सोशल मीडियावर मोठे चाहते आहेत. या माय-लेकाच्या जोडीने मध्यमवर्गीय मराठी कुटुंबाचे चांगलेच मनोरंजन केले होते. प्रथमेशच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही. मात्र, डिसेंबर २०२५ मध्ये त्याने एक व्हिडिओ पोस्ट करून आपली मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचे सांगितले होते, ज्यामुळे तो काहीसा तणावात असल्याची चर्चा होती.

# मुळा–मुठा नदीकाठ सुधारणा प्रकल्पाचा पहिला टप्पा अंतिम टप्प्यात

## १५ फेब्रुवारीपासून नागरिकांसाठी ट्रॅक खुला

**पुणे, ता. २६ :** पुणे महानगरपालिके मार्फत राबविण्यात येत असलेल्या मुळामुठा नदीकाठ सुधारणा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. पुणे शहरातून वाहणाऱ्या सुमारे ४४ किलोमीटर लांबीच्या मुळामुठा नदीपैकी संगमवाडी ते बंडगार्डन दरम्यान ३.७ किलोमीटर लांबीच्या नदीकाठ सुधारणा प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले असून, यातील सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.

या प्रकल्पांतर्गत संगमवाडी येथील १.५० किलोमीटर लांबीचा टप्पा सर्वार्थाने पूर्ण झाला असून पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत अतिरिक्त आयुक्त व शहर अभियंता यांच्यासह कामाची पाहणी करण्यात आली. यावेळी नदीकाठ परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

पूर्ण झालेल्या या १.५० किलोमीटर ट्रॅकचे औपचारिक लोकार्पण पुणे महानगरपालिका वर्धापन दिनानिमित्त १५ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. हा ट्रॅक नागरिकांसाठी सकाळी ६ ते ९ आणि सायंकाळी ५ ते ८ या वेळेत वापरासाठी खुला राहणार आहे. बंडगार्डन ते मुंढवा (५.५ किमी) तसेच औंध ते बालेवाडी (८.१ किमी) या टप्प्यांचे कामही प्रगतीपथावर आहे. मार्च २०२६ अखेर संगमवाडी ते कल्याणीनगर दरम्यान सुमारे ५ किलोमीटर लांबीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन असून, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी व मंत्री यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे.



दरम्यान, या नदीकाठ सुधारणा प्रकल्पाअंतर्गत थीम पार्कसह विविध नागरी सुविधा विकसित करण्यात येणार असून, यामुळे पुणेकरांना चालणे, सायकलिंग व विरंगुळ्यासाठी पर्यावरणपूरक व सुरक्षित सुविधा उपलब्ध होणार आहेत.

# मालेगाव शहरात फुगेविक्रेत्याच्या नायट्रोजन सिलिंडरचा भीषण स्फोट

## लहान मुलांसह पाच जण गंभीर जखमी

**नाशिक, ता. २६ :** मालेगाव शहरात प्रजासत्ताक दिनाच्या उत्साहावर पाणी फेरणारी गंभीर घटना सोमवारी सकाळी घडली. पोलीस परेड मैदानापासून अवघ्या २५० मीटर अंतरावर फुगे विक्रेत्याच्या नायट्रोजन गॅस सिलिंडरचा अचानक भीषण स्फोट झाला. या स्फोटात दोन लहान मुले, दोन महिला व एका पुरुषासह पाच जण गंभीर जखमी झाले आहेत.

सकाळी पोलीस परेड मैदानावर व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम सुरू होता. राष्ट्रीय ध्वजाला सलामी देण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, शाळकरी विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. याचवेळी




मैदानाच्या जवळच एक फुगेविक्रेता नायट्रोजन गॅसच्या साहाय्याने फुगे फुगवून विक्री करत होता. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने अनेक मुले व कुटुंबे फुगे खरेदीसाठी त्याच्याजवळ थांबली असतानाच सिलिंडरचा जोरदार स्फोट झाला.

स्फोट इतका तीव्र होता की त्याचा आवाज दूरवर ऐकू गेला आणि परिसरात एकच गोंधळ उडाला. काही काळ दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तवली जात होती; मात्र पोलिसांच्या प्राथमिक तपासात हा अपघात असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेत विनोद थोरात, मोहित जाधव, अतुल शेवाळे, प्रमिला यादव आणि उज्ज्वला महाजन हे जखमी झाले असून, त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारांसाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, नायट्रोजन गॅस सिलिंडरमध्ये तांत्रिक बिघाड, देखभालीचा अभाव किंवा क्षमतेपेक्षा जास्त दबाव निर्माण झाल्यामुळे हा स्फोट झाला असावा. या घटनेमुळे सार्वजनिक कार्यक्रम दरम्यान वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. सण-उत्सवांच्या काळात फुगे, खेळणी व खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांकडील साहित्याची तपासणी अधिक काटेकोरपणे करण्याची गरज असल्याचे प्रशासनाकडूनही सांगण्यात येत आहे.

## भाजप त्यांना महापौर तर दूरच, उपमहापौरही देणार नाही; अंधारेंनी शिंदे सेनेची खिल्ली उडवली



**मुंबई, ता. २६ :** मुंबई महापालिकेतील सत्तासंघर्ष आणि साताऱ्यातील ड्रग्स कारवाईच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी शिंदे गट आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. भाजपकडून शिंदे गटाला महापौरच नाही तर उपमहापौरपद देण्याचीही इच्छाशक्ती दिसत नसल्याचा टोला त्यांनी लगावला. सत्तेत असूनही स्वायत्तता नसणे हीच शिंदे गटाची खरी अडचण असल्याचे त्यांनी सूचक शब्दांत मांडले.

साताऱ्यातील अमली पदार्थांविरोधातील कारवाईचा उल्लेख करत अंधारे यांनी कारवाईच्या टायमिंगवर प्रश्न उपस्थित केला. ड्रग्सचे समूळ उच्चाटन व्हावे, ही मागणी आम्ही बराच काळ करत होतो. मात्र तेव्हा कारवाई झाली नाही. आता मुंबईचा महापौर निवडण्याची वेळ आली असताना अचानक कारवाया सुरू होतात, हे फारच योगायोगाचे असल्याचे त्यांनी म्हटले. या सगळ्याची जाणीव शिंदे गट आणि अजित पवार गटालाही असल्याचा दावा करत, ते जाणूनबुजून यावर मौन बाळगत असल्याची टीका त्यांनी केली.

शिंदे गटावर आणखी जहाल टीका करताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, उद्या जर वरिष्ठांनी शाह सेनेला पक्ष बंद करण्याचा आदेश दिला, तर तेही मान्य करतील. ही मानसिकता म्हणजे सत्तेची भाटगिरी असल्याचा आरोप त्यांनी केला. जे व्यवस्थेचे गुणगान करतात, त्यांनाच व्यवस्था पुरस्कृत करते, तर जे व्यवस्थेतील दोष दाखवतात त्यांना बाजूला काढले जाते, अशी टीका त्यांनी केली.

भाटगिरी करणाऱ्यांना पुरस्कार मिळत असतील, तर व्यवस्थेचे नियम अजूनही बदललेले नाहीत, असा टोला लगावत अंधारे यांनी भाजप आणि सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. या वक्तव्यांमुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, महापालिका निवडणुका आणि सत्तावाटपाच्या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# जेजुरीच्या ३५० कोटींच्या निधीवरून रोहित पवारांनी विजय शिवतारेंना सुनावले

### अजित पवारांची पाठराखण



**पुणे, ता. २६ :** राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापलं असून, शिवसेना शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्यात जोरदार शाब्दिक संघर्ष रंगला आहे. पुरंदर तालुक्यातील खंडोबा मंदिराच्या विकासावरून सुरू झालेल्या टीकेमुळे हा वाद थेट शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यापर्यंत पोहोचला आहे.

विजय शिवतारे यांनी शरद पवार आणि अजित पवार यांच्यावर तीव्र शब्दांत टीका करताना, त्यांनी सत्तेवर असताना राज्यातील अनेक देवस्थानांना देणग्या दिल्या, मात्र पुरंदर येथील खंडोबा मंदिराच्या विकासाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री आणि अजित पवार पाच वेळा उपमुख्यमंत्री असतानाही या भागासाठी वेळ काढला नाही, असा दावा शिवतारे यांनी केला. टीकेदरम्यान त्यांनी आक्षेपार्ह भाषा वापरत नेतेच दळभद्री असे विधान केल्याने राजकीय वर्तुळात संतापाची प्रतिक्रिया उमटली.

या आरोपांना रोहित पवार यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. तीन वेळा आमदार आणि पाच वर्षे मंत्री राहूनही स्वतःच्या मतदारसंघाचा अपेक्षित विकास करू न शकणाऱ्या विजय शिवतारे यांना पवार साहेब आणि अजितदादा यांच्यावर टीका करण्याची नैतिक पात्रता आहे का, असा थेट सवाल रोहित पवार यांनी केला. जेजुरी गडाच्या विकासासाठी अर्थसंकल्पात घोषणा करून ३५० कोटींच्या विकास आराखड्याला मान्यता देत निधी उपलब्ध करून देणारे अजित पवारच होते, याचा विसर शिवतारेंना पडला असल्याचा टोला त्यांनी लगावला.

रोहित पवार यांनी शिवतारेंच्या राजकीय वाटचालीवरही टीका केली. ज्या पक्षाने त्यांना आमदारकी आणि मंत्रीपद दिलं, त्याच पक्षाला त्यांनी फसवलं, त्यामुळे त्यांच्या टीकेकडे गंभीरपणे पाहण्याचं कारण नसल्याचं त्यांनी म्हटलं. आजची टीका ही त्यांच्या स्वतःच्या अपयशाची अप्रत्यक्ष कबुली असल्याचाही आरोप करण्यात आला.

दरम्यान, या वादामुळे पुरंदरचा विकास हा मुद्दा राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या केंद्रस्थानी आला असून, आगामी काळात हा संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हं दिसत आहेत.

## भवरापूरमध्ये खाजगी सावकारकीचा बळी?

### एक एकर जमीन गेली तरी तगादा थांबत नसल्याने शेतकऱ्याची आत्महत्या



**उरुळी कांचन, ता. २६ :** शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी योजना, घोषणा आणि मेळावे सुरू आहेत. पण गावागावात खुलेआम चालणारी खाजगी सावकारकी मात्र रोखण्यात प्रशासन सपशेल अपयशी ठरत आहे. याचे जिवंत उदाहरण भवरापूर (ता. हवेली) येथे रविवारी (ता. २५) सायंकाळी पाहायला मिळाले. खाजगी सावकाराच्या अमानुष जाचाला कंटाळून कैलास बबनराव साठे (वय-५२) या शेतकऱ्याने घराच्या पाठीमागे गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला असून संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

कैलास साठे हे अल्पभूधारक, कष्टकरी शेतकरी होते. शेतीतील अडचणी व कौटुंबिक गरजांमुळे त्यांनी एका खाजगी सावकाराकडून कर्ज घेतले होते. या कर्जाच्या बदल्यात त्यांनी तब्बल एक एकर शेतजमीन त्या सावकाराच्या नावावर करून दिली होती. एवढे करूनही सावकाराचा लोभ शमला नाही. पैशांचा सतत तगादा, मानसिक छळ, धमकावणे आणि अपमानास्पद वागणूक सुरूच होती, असा गंभीर आरोप साठे कुटुंबीयांनी केला आहे.

जमीनही घेतली आणि तरीही जगणं अशक्य केलं, अशी हतबल भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली. सततच्या दबावाखाली कैलास साठे पूर्णपणे खचले होते. अखेर रविवारी सायंकाळी त्यांनी जीवन संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतला. काही वेळाने त्यांचा मुलगा व पत्नी यांना कैलास साठे गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. कुटुंबीयांनी तात्काळ उरुळी कांचन पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत त्यांना रुग्णालयात दाखल केले; मात्र डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

दरम्यान, खाजगी सावकाराच्या जाचामुळेच कैलास साठे यांनी आत्महत्या केली, असा थेट आरोप कुटुंबीयांनी केला असून संबंधित सावकारावर कठोर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली आहे. भवरापूर व परिसरात खाजगी सावकारकी खुलेआम सुरू असताना प्रशासन, पोलीस आणि महसूल यंत्रणा नेमकी काय करत होती? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

एकीकडे शेतकरी कर्जमाफीच्या घोषणा आणि दुसरीकडे सावकारांच्या दहशतीत शेतकऱ्यांचे बळी. खाजगी सावकारकी थांबवण्यासाठी प्रशासन कधी जागे होणार, की आणखी प्रेतांनंतरच हालचाल होणार? असा रोष व्यक्त होत आहे.

## पाटील–भरणे जोडीचा 'झिंग झिंग झिंगाट' डान्स; झेडपी निवडणुकीपूर्वी कट्टर शत्रू झाले 'दोस्त'

**आदित्य बोराटे**



इंदापूर, ता. २६ : इंदापूरच्या राजकारणात दीर्घकाळ एकमेकांच्या विरोधात उभे राहिलेले माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील आणि राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे नाव घेताच संघर्ष, आरोप-प्रत्यारोप आणि थेट निवडणूक लढतींची आठवण येते. मात्र आता हेच कट्टर प्रतिस्पर्धी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकत्र आले असून, त्याचेच प्रतीकात्मक दर्शन रविवारी इंदापूरमध्ये घडले.

इंदापूर स्पोर्ट्स अँड हेल्थ फाउंडेशनच्या वतीने आयोजित इंद्रेश्वर मॅरेथॉन सिझन१ च्या समारंभात राजकीय मतभेद विसरून हर्षवर्धन पाटील आणि दत्तात्रय भरणे यांनी एकाच मंचावर सैराट चित्रपटातील गाजलेल्या झिंग झिंग झिंगाट गाण्यावर ठेका धरला. या अनपेक्षित क्षणाने उपस्थितांमध्ये उत्साहाची लाट उसळली. नगराध्यक्ष भरत शहा यांच्यासह शेकडो विद्यार्थी आणि युवकांनीही या आनंदात सहभाग घेतला.

या प्रसंगाला केवळ करमणुकीपुरताच अर्थ न राहता, त्याला स्पष्ट राजकीय संकेत लाभले. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी दोन्ही गट एकत्र आल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये एकीचं वातावरण निर्माण झालं आहे. पूर्वी एकमेकांविरुद्ध काम करणारे कार्यकर्ते आता एकाच ध्येयाने मैदानात उतरल्याचं चित्र दिसत आहे.

हा डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल होत असून, राजकीय मतभेद बाजूला ठेवून पक्षबांधणीचा नवा अध्याय अशी चर्चा सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सध्या आनंद, आत्मविश्वास आणि उत्साहाचं वातावरण असून, येणाऱ्या निवडणुकांपूर्वी हा झिंगाट ठेका पक्षासाठी ऊर्जा देणारा ठरत असल्याचं चित्र आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## हिवाळ्यात जेवल्यानंतर तुम्हालाही गोड पदार्थ खाण्याची इच्छा होते का?

हिवाळ्यात आपल्यापैकी अनेकांना जेवणानंतरही काहीतरी गोड खाण्याची इच्छा होते. हिवाळ्यात दिवस लहान होत असताना आणि तापमान कमी होत असताना, शरीर आपोआप अधिक ऊर्जा प्रदान करणाऱ्या पदार्थांकडे वळते. यामध्ये गोड पदार्थांचा समावेश आहे. खरंतर, थंड हवामानात, शरीर स्वतःला उबदार आणि संतुलित ठेवण्यासाठी अतिरिक्त ऊर्जा शोधते. म्हणूनच आपल्याला खाल्ल्यानंतरही अनेकदा गोड पदार्थ किंवा काहीतरी गोड पदार्थ हवे असतात.

या ऋतूतील बदलाचा केवळ भूकच नाही तर मनःस्थितीवरही परिणाम होतो. काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की हिवाळ्यात कार्बोहायड्रेट्स आणि मिठाई खाण्याची इच्छा सर्वाधिक होते. फुड क्वालिटी अँड प्रेफरन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, थंड हवामान, कमी सूर्यप्रकाश आणि हिवाळ्याशी संबंधित मानसिक धारणा लोकांना हलक्या अन्नापेक्षा जास्त कॅलरीयुक्त पदार्थ शोधण्यास प्रवृत्त करतात. सोप्या भाषेत सांगायचे तर, जसजसे हवामान थंड आणि गडद होत जाते तसतसे शरीर आणि मन दोन्ही अधिक ऊर्जायुक्त पदार्थ खाण्यास सुरुवात करतात.

दरम्यान, मानसिक आरोग्यावरील संशोधनातून असे दिसून आले आहे की, हिवाळा आपल्या भावनांवर देखील परिणाम करतो. वसंत ऋतु किंवा उन्हाळ्यापेक्षा हिवाळ्यात जास्त कार्बोहायड्रेट्स आणि मिठाई खातात. संशोधकांच्या मते, मिठाई आणि कार्बोहायड्रेट्सची इच्छा ही हिवाळ्यातील नैराश्याच्या मुख्य लक्षणांपैकी एक आहे.

गोडाची इच्छा कशी नियंत्रित करावी?

उन्हात वेळ घालवणे किंवा लाईट थेरपी लॅम्प वापरणे मूड आणि बॉडी क्लॉक सुधारते, ज्यामुळे गोड पदार्थांची तीव्र इच्छा कमी होऊ शकते. सूप, स्टू, गरम धान्य आणि भाज्या यासारखे पोट भरणारे आणि पौष्टिक पर्याय पाळा. चालणे, स्ट्रेचिंग किंवा घरातील व्यायाम रक्तातील साखरेचे संतुलन राखण्यास आणि मूड सुधारण्यास मदत करू शकतात.

हिवाळ्यात एकटेपणा आणि ताण वाढू शकतो. मित्रांशी बोलणे, छंदांमध्ये सहभागी व्हा.

घरात काजू, चहा, फळे यासारखे निरोगी पर्याय साठवा जेणेकरून गोड पदार्थ हा तुमचा एकमेव पर्याय नसेल.

# पुणे सोलापूर महामार्गावर रिक्षातून अवैध प्रवासी वाहतूक सुसाट; प्रशासन कारवाई कधी करणार?

**उरुळी कांचन, ता. २६ :** पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील हडपसर ते वरवंड यादरम्यान सध्या रिक्षातून सुरू असलेली अवैध प्रवासी वाहतूक म्हणजे अक्षरशः मृत्यूला आमंत्रण देण्यासारखी ठरत आहे. नियम, कायदे आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला हरताळ फासून प्रवाशांना मेंढरांसारखे रिक्षात कोंबून वाहतूक केली जात असून, यामुळे कधीही मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र, एवढी गंभीर परिस्थिती असतानाही पोलीस प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र दिसत आहे.



हडपसर, लोणी काळभोर, उरुळी कांचन ते यवत या मार्गावर दररोज सकाळ-संध्याकाळ अवैध प्रवासी वाहतूक खुलेआम सुरू असते. एका रिक्षामध्ये क्षमतेपेक्षा दुप्पट प्रवासी कोंबले जातात. अनेक वेळा प्रवाशांना उभे राहून, दरवाजाबाहेर लोंबकळत प्रवास करावा लागतो. रिक्षाचालक बेदरकारपणे वेगाने वाहन चालवतात. नियमांची आठवण करून दिल्यास प्रवाशांशी अरेरावी, दमदाटी तसेच शिवीगाळ केली जाते. अपघात घडल्यास जबाबदारी कोण घेणार, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात सुरू असलेली ही अवैध प्रवासी वाहतूक प्रशासनाच्या नजरेतून कशी सुटते, हाच मोठा संशयाचा मुद्दा ठरत आहे. हडपसर व लोणी काळभोर वाहतूक पोलीस नेमकेकरतात तरी काय, असा सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. उरुळी कांचन व यवत पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक नियमनाचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र असून, नियम तोडणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई करण्याऐवजी प्रशासन मौन बाळगत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन खडबडून जागे होणार का? असा थेट सवाल आता सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. या अवैध प्रवासी वाहतुकीला वरदहस्त नेमका कोणी दिला आहे? यामागे काही आर्थिक हितसंबंध दडले आहेत का, अशी जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे.


दरम्यान, नागरिकांच्या जीवाची किंमत शून्य समजली जाते का, असा रोखठोक सवाल उपस्थित होत असताना प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई न केल्यास संतप्त नागरिक रस्त्यावर उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### प्रवासी वाहतुकीचा व्हिडीओ पुणे प्राईम न्यूजच्या हाती

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील उरुळी कांचन येथे रिक्षातून अवैध प्रवासी वाहतुकीचा धक्कादायक व्हिडीओ दैनिक पुणे प्राईम न्यूजच्या हाती लागला आहे. या व्हिडीओमध्ये क्षमतेपेक्षा दुप्पट प्रवासी रिक्षामध्ये कोंबलेले स्पष्टपणे दिसत असून प्रवासी उभे राहून, दरवाजाबाहेर लोंबकळत प्रवास करत असल्याचे चित्रण आहे. धोकादायक वेगाने रिक्षा चालविल्या जात असून कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊ शकतो, हे दृश्यातून स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे ही अवैध प्रवासी वाहतूक राष्ट्रीय महामार्गावर, वर्दळीच्या ठिकाणी, दिवसाढवळ्या सुरू असल्याचे व्हिडीओतून समोर आले आहे.

# कराडच्या दुर्गम भागात ड्रग्जची 'फॅक्टरी'?; पुण्याच्या डीआरआय पथकाचा छापा

**सातारा, ता. २६ :** सातारा जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या जाळ्यावर पुन्हा एकदा मोठा घाव घालण्यात आल्याने जिल्हाभर खळबळ उडाली आहे. कराड तालुक्यातील पाचुकतेवाडी परिसरात पुण्याच्या डायरेक्टरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स विभागाच्या पथकाने अचानक छापा टाकून एक शेड सील केल्याची माहिती समोर आली आहे. अवघ्या महिनाभरापूर्वी जावळी तालुक्यातील सावरी गावात मुंबईच्या पथकाने शेकडो कोटींचे अमली पदार्थ जप्त केल्यानंतर ही दुसरी मोठी कारवाई असल्याने सातारा जिल्हा पुन्हा एकदा ड्रग्स नेटवर्कच्या चर्चेत आला आहे.



प्राथमिक माहितीनुसार, पाचुकतेवाडीतील संबंधित शेडमध्ये अमली पदार्थांची निर्मिती सुरू असल्याची ठोस माहिती डीआरआय पथकाला मिळाली होती. त्यानुसार कोणतीही पूर्वसूचना न देता छापा टाकण्यात आला आणि संपूर्ण परिसर सील करण्यात आला. या ठिकाणी नेमक्या कोणत्या प्रकारचे अमली पदार्थ तयार केले जात होते, उत्पादन किती प्रमाणात होते आणि हे नेटवर्क कुठपर्यंत पसरले आहे, याबाबत सध्या अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

या कारवाईतील महत्त्वाची बाब म्हणजे सातारा जिल्हा पोलीस आणि कराड पोलीस यांना या छाप्याबाबत कोणतीही पूर्वकल्पना देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे ही कारवाई अत्यंत गोपनीय पद्धतीने करण्यात आल्याचे स्पष्ट होते. केंद्रीय तपास यंत्रणांनी थेट हस्तक्षेप केल्यामुळे स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या ड्रग्स साखळीचा मोठा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मात्र, या छाप्यात नेमकेकाय जप्त करण्यात आले, किती जणांना ताब्यात घेण्यात आले किंवा अटक झाली आहे का, याबाबत अधिकृत माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. पुण्याच्या डीआरआय विभागाकडून तपास पूर्ण झाल्यानंतरच तपशील समोर येण्याची शक्यता आहे.

सावरी आणि पाचुकतेवाडी या दोन कारवायांमुळे सातारा जिल्हा अमली पदार्थांच्या तस्करीसाठी केंद्रबिंदू बनत चालला आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली असून, जिल्ह्यातील तरुण पिढी आणि सामाजिक सुरक्षिततेबाबत गंभीर सवाल निर्माण झाले आहेत.

# उपअधीक्षक दयानंद गावडेंना 'राष्ट्रपती पोलीस पदक' जाहीर

**पुणे, ता. २६ :** पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक दयानंद गावडे यांना त्यांच्या ३० वर्षांच्या निष्कलंक आणि धडाकेबाज सेवेसाठी केंद्र सरकारने त्यांना 'राष्ट्रपती पोलीस पदक' जाहीर केले आहे.



सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील 'गणवरे' या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबातून गावडे यांचा प्रवास सुरू झाला. १९९६ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून खाकी वर्दी परिधान केल्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. मुंबईची गुन्हेगारी असो, रायगड किंवा सोलापूर-पुणे ग्रामीणचा भाग, प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपल्या कामाची एक वेगळी छाप सोडली. विशेषतः शिरूरमध्ये पोलीस निरीक्षक असताना त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी केलेले प्रयत्न आजही स्थानिक नागरिक विसरलेले नाहीत.

राष्ट्रपती पोलीस पदक हे केवळ एका वर्षाच्या कामगिरीचे फळ नसते. यासाठी सेवापुस्तिका अत्यंत स्वच्छ असावी लागते. दयानंद गावडे सध्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागात कार्यरत आहेत. सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार मोडीत काढण्यासाठी त्यांनी आखलेल्या मोहिमा आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांचा केलेला यशस्वी तपास, यामुळे त्यांच्या कामाचे कौतुक केले जात आहे. दयानंद गावडे यांना मिळालेला हा सन्मान म्हणजे खाकी वर्दीतील प्रामाणिकपणाचा विजय आहे.

# भगतसिंह कोश्यारींना पद्मभूषण जाहीर होताच संजय राऊतांनी डागली तोफ

## छत्रपतींचा अपमान करणाऱ्यांचा भाजप सन्मान करतोय

**मुंबई, ता. २६ :** प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण पुरस्कारांची घोषणा केली. या यादीत महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या घोषणेनंतर राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या असून, शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

संजय राऊत यांनी सोशल मीडियावरून प्रतिक्रिया देत, भगतसिंह कोश्यारी यांच्या निवडीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. महाराष्ट्रात लोकशाही आणि भारतीय संविधानाची हत्या करून शिंदे-



भाजप सरकार सत्तेत बसवल्याच्या भूमिकेसाठी कोश्यारी यांना सन्मानित केल्याचा आरोप त्यांनी केला. ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले दाम्पत्याविषयी अपमानास्पद वक्तव्ये केली, अशा व्यक्तीला सन्मान देऊन भाजप महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्यांनाच गौरवते, असा आरोप राऊत यांनी केला आहे.

भगतसिंह कोश्यारी हे २०१९ ते २०२३ या कालावधीत महाराष्ट्राचे राज्यपाल होते. या काळात राज्यातील सत्तासंघर्ष, महाविकास आघाडी सरकार आणि नंतर शिंदे-भाजप सरकार स्थापनेच्या प्रक्रियेत त्यांची भूमिका सातत्याने चर्चेत राहिली. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या पहाटेच्या शपथविधीपासून ते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन होईपर्यंत अनेक निर्णायक टप्प्यांमध्ये कोश्यारी राज्यपालपदावर होते. याच काळात त्यांनी गोव्याच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही सांभाळला. यापूर्वी ते उत्तराखंडचे पहिले मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्रीही राहिले आहेत.

मात्र, महाराष्ट्राचे राज्यपाल असताना कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे राज्यात तीव्र असंतोष निर्माण झाला होता. त्यांच्या वक्तव्यांविरोधात आंदोलनं झाली, राजीनाम्याची मागणी झाली आणि मोठ्या प्रमाणात टीका झाली. अशा पार्श्वभूमीवर पद्मभूषण पुरस्काराची घोषणा झाल्याने, हा सन्मान आहे की वादांना पुन्हा उजाळा देणारा निर्णय, असा प्रश्न राज्याच्या राजकारणात उपस्थित झाला आहे.

# पुण्यात खून करून लातुरात लपले; पोलिसांनी पाच जणांना ठोकल्या बेड्या

**पुणे, ता. २६ :** पुण्यातील खराडी परिसरात एका तरुणाचा निर्घृण खून करून फरार झालेल्या पाच गुन्हेगारांना लातूर पोलिसांनी अटक केल्याने मोठी कारवाई यशस्वी ठरली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. याच बंदोबस्ता दरम्यान संशयावरून तपास करताना पुण्यातील खुनाचा उलगडा झाला.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला एमआयडीसी पोलीस ठाण्याचे चार्ली पथक भांबरी चौक ते साई नाका रिंग रोड परिसरात गस्त घालत होते. गस्तीदरम्यान एका पेट्रोल पंपाजवळ अंधारात झाडाखाली पाच तरुण बसलेले दिसून आले. पोलिसांनी चौकशी केली असता त्यांनी



समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. हे सर्व तरुण १८ ते २० वयोगटातील होते.

ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्यांचे फोटो पुणे पोलिसांच्या अधिकृत व्हॉट्सप ग्रुपवर पाठवले. काही वेळातच पुणे पोलिसांकडून माहिती मिळाली की हे पाचही जण २४ जानेवारी रोजी वाघोली-खराडी भागात झालेल्या खुनाच्या गुन्ह्यात फरार होते. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेनुसार गंभीर गुन्हा दाखल आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे कैलास विठ्ठल राठोड, गणेश चंद्रकांत कट्टे, सुशील सुभाष कदम, करण विठ्ठल तुरे आणि रोहित विकास गायकवाड अशी आहेत. हे सर्व आरोपी पुणे शहरातील विविध भागात राहणारे आहेत. रात्री सुमारे १ वाजेपर्यंत कारवाई पूर्ण करून लातूर पोलिसांनी पाचही आरोपींना पुढील तपासासाठी पुणे पोलिसांच्या ताब्यात दिले.

या खुनामागील घटना अत्यंत धक्कादायक आहे. वाघोली परिसरातील एका सोसायटीमध्ये मित्राच्या घरी जमलेल्या तरुणांमध्ये किरकोळ वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि रागाच्या भरात पाच मित्रांनीच २१ वर्षीय विकी विजय दिवटे याची चाकूने गळा चिरून हत्या केली. ही घटना गुन्हे शाखेच्या कार्यालयाजवळ घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त भुलेश्वरच्या पिंडीवर तिरंगा झळकला

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. २६ : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. शासकीय कार्यालये, मंदिरे व धार्मिक स्थळांवर आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर दौंड-पुरंदर तालुक्याच्या सीमेवर असलेल्या श्री क्षेत्र भुलेश्वर देवस्थान येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

प्रजासत्ताक दिनानिमित्त भुलेश्वर येथील शिवलिंगावर भारताच्या तिरंगा ध्वजाच्या रंगांप्रमाणे फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.



झेंडू, शेवंती व पानांनी मंदिर परिसर, मुख्य गाभारा व पिंडी तिरंगी रंगात नटली होती. गाभाऱ्यातील तिरंगी फुलांची सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरली.

आज देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा होत असताना भुलेश्वरमध्येही उत्साहाचे वातावरण होते. शनिवार, रविवार व सोमवार अशा सलग सुट्ट्यांमुळे भुलेश्वर देवस्थानात दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. हर हर महादेव व भारत माता की जयच्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता.

यावेळी सूर्यज म्हस्के, मोहन आखाडे, नाना आखाडे व इतर शिवभक्तांच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. मात्र, वन विभागाच्या हद्दीत अनेक भाविकांनी रस्त्यावर वाहने उभी केल्यामुळे मंदिराकडे जाणाऱ्या व येणाऱ्या मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होत होती.

# दादा पाटील फराटे यांनी पुनर्विचार करावा; मनोगताचे खुले पत्र सोशल मीडियावर व्हायरल


**योगेश मारणे**

न्हावरे, ता. २६ : नवीन आघाडी स्थापन करून जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याच्या दादापाटील फराटे यांच्या निर्णयाबाबत पक्षातीलच नव्हे तर सामान्य कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता निर्माण झाली असून, भारतीय जनता पक्षाचे मांडवगण फराटावडगाव रासाई जिल्हा परिषद गटाचे उमेदवार सचिन बंडू शेलार यांनी दादापाटील फराटे यांना भावनिक खुले पत्र लिहीत आपल्या मनातील भूमिका स्पष्ट केली आहे.

आपल्या पत्रात सचिन शेलार यांनी नमूद केले आहे की, शालेय जीवनापासून लोकनेते दादापाटील फराटे यांचे नाव ऐकत आलो असून, गेल्या १७ वर्षांपासूनचा त्यांचा सत्तेविरुद्धचा संघर्ष आम्ही जवळून अनुभवला आहे. कार्यकर्त्यांशी कधीही प्रतारणा न करणारा नेता म्हणून दादापाटील फराटे यांची ओळख आहे, असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

मीएकसामान्यशेतकरीकुटुंबातील तरुण असून, ज्या घातक आणि कुटील शक्तींविरोधात दादापाटील फराटे यांनी संघर्ष केला, त्याच शक्तींविरोधात मागील एक तप मीही लढत असल्याचे सचिन शेलार यांनी स्पष्ट केले आहे. या संघर्षाच्या काळात दादापाटील फराटे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याची कृतज्ञताही त्यांनी व्यक्त केली.

भारतीय जनता पक्षाकडून जिल्हा परिषद गटाचे तिकीट मिळाल्यानंतर परिसरात सकारात्मक वातावरण तयार




झाले असतानाच, दादापाटील फराटे यांनी निवडणूक लढवण्याचा घेतलेला निर्णय आपल्यासाठी धक्कादायक ठरल्याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे. कुटीलनीती वापरणाऱ्या नेत्यांविरोधातील लढाईत सामान्य कुटुंबातील तरुणांची ताकद दुभंगली जाणार आहे, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

मागील जिल्हा परिषद, कारखाना निवडणुका, जिल्हा बँक निवडणूक तसेच विधानसभा निवडणुकीच्या तयारीदरम्यान आपण कार्यकर्ता म्हणून प्रामाणिकपणे काम केल्याची आठवण करून देत, आज जिल्हा परिषद ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. मी मागील सहा ते सात वर्षांपासून तयारी करतो आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. आजही तुम्ही माझ्यासाठी पितृस्थानी आहात. काळ अत्यंत कसोटीचा आहे. त्यामुळे एकदा शांतपणे वाघेश्वराचे स्मरण करून निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी भावनिक साद सचिन शेलार यांनी या पत्रातून घातली आहे.

विघातक शक्ती पुन्हा उभ्या राहिल्यास सामान्य जनता त्रासात जाईल, हे जाणते नेते म्हणून दादापाटील फराटे नक्कीच लक्षात घेतील, अशी अपेक्षा व्यक्त करत, मला तुमचा मुलगा समजून सांभाळून घ्यावे व सहकार्य करावे, अशी आर्त विनंतीही त्यांनी शेवटी केली आहे. या पत्रामुळे मांडवगण फराटावडगावरासाईजिल्हापरिषद गटातील राजकीय वातावरण अधिकच भावनिक व चर्चेचे बनले असून, दादापाटील फराटे यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.